# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ९०-२२** **दिनांक - २५/०३/२०२२**

## ॲक्युप्रेशर थेरेपीच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालविणा-या थेरेपी सेंटरवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक २४.०३.२०२२ रोजी अनैतिक मानवी प्रतिबंध कक्षाचे वपोनि श्री. पाटील यांना त्यांचे विश्वसनीय बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, "**ॲक्युप्रेशर थेरेपी सेंटर**", बिल्डींग नं. १, हॅप्पी होम कॉम्प्लेक्स, शांतीपार्क, मिरारोड पुर्व येथे ॲक्युप्रेशर थेरेपी सेंटरचा चालक व व्यवस्थापक हे ॲक्युप्रेशर थेरेपीच्या नावाखाली पुरुष गि-हाईकांना वेश्यागमनाच्या मोबदल्यात मुली पुरवितात.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वपोनि. श्री. एस. एस. पाटील यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना "ॲक्युप्रेशर थेरेपी सेंटर" शॉप नं. ११, बिल्डीग नं. १, हॅप्पी होम कॉम्प्लेक्स शांतीपार्क, मिरारोड पुर्व या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह छापा टाकला आसता ॲक्युप्रेशर थेरेपी सेंटरचा व्यवस्थापक **निलोफर मुस्ताक तांबोळी** व थेरेपी सेंटरचा चालक करीम उर्फ राज कानानी यांनी आपसात संगनमत करुन ॲक्युप्रेशर थेरेपी सेंटरमध्ये बोगस गिऱ्हाईकास ०३ मुलींना दाखवुन, वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन, वेश्यागमनाच्या मोबदल्यात रक्कम ठरविली व रक्कम स्विकारुन बोगस गिऱ्हाईकाला मुली पुरविल्याने वेश्यागमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०३ पिडित मुलींची सुटका करण्यात आली आहे. सदर बाबत सपोउपनि. उमेश हरी पाटील यांचे फिर्यादीवरुन आरोपी १) व्यवस्थापक निलोफर मुस्ताक तांबोळी, २) चालक करीम उर्फ राज कानानी रा. मिरारोड यांचेविरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I १३३/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३७० सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. श्री. संपतराव पाटील, सपोउनि. उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, चा. पोहवा/०६१०६ सम्राट गावडे, मपोहवा. वैष्णवी यंम्बर, सुप्रिया तिवले सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी केली आहे.

---ooo---